सं.फौ.खटला क्र. ७४०/२०२५
सरकार वि. सुनिल
निशाणी क्र. १५ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ ची साक्ष शपथेवर सुरु :-**

नाव : अमोल रामकिसन तांबे,
वय : ३४ वर्ष, कामधंदा : पोलिस उप निरीक्षक, देवलापार

**सरतपास शपथेवर सुरु** :-
**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती रणवरे मॅडम यांच्यामार्फत** :-

१} मी ऑकटोबर २०२४ पासुन पोलिस स्टेशन देवलापार येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दिनांक २९-०१-२०२५ मी व माझयासोबत मोहम्मद सलीम ब.क्रं. ९८०, पोलिस नाईक तुषार खडके ब.क्रं २१६६ असे पो.स्टे. देवलापार अंतर्गत पवनी बिट येथे पेटरोलिंग करत असतांना सांकाळी ५.३० वाजताच्या सुमारास गुप्त माहिती मिळाली की, पवनी येथील सुनील उईके आपल्या घरी मोहाफुल दारू बाळगुन त्याची विक्री करत आहे. त्यानंतर आम्ही पवनी येथील दोन पंच नामे हरीष चौकशे व मोरेश्वर कोडवते यांना संमंस देवुन पंचनामा करीता हजर राहण्यास सांगितले.
२} आम्ही सर्व आरोपीच्या घरी पवनी येथील वार्ड क्रं. ५ येथे जावुन आरोपीच्या घराची पाहणी केली असता त्याच्या घरात दोन प्लास्टीक बॉटल व एक प्लास्टीकची कैनमध्ये एकुण ५ लिटर मोहाफुल दारू मिळुन आली. त्यापैकी सि.ए. तपासणी करीता १८० एम.एल. एका काचेच्या शिशी मध्ये वेगळी काढुन सिलबंद केले व व त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. तसेच उर्वरीत दारू मोक्यावर पंचांसमक्ष नाश करण्यात आली. त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करण्यात आला. आरोपीला सुचनापत्रावर सोडले. आता मला पंचांना दिलेले संमस दाखविण्यात आले. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं १७** देण्यात येते. आता मला सदरचा घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं १८** देण्यात येते.
३} त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशन येथे सि.ए. तपासणी करीता मुददेमाल पाढविण्यात आला. त्याचे पत्र आता मला दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं १९** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपीविरूध्द लेखी फिर्यादी दिली. आता मला सदरची फिर्याद व एफ. आय.आर. दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं २० व २१** देण्यात येते. आरोपीला पाहल्यास मी ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती वाहणे यांच्यामार्फत** :-

४}		आम्ही घटनेदिवशी कोणत्या वाहणाने पेटरोलिंग होतो, हे फिर्याद मध्ये नमुद नाही. पेटरोलिंग करीता रवाणगी झाल्याबाबत स्टेशन डायरी नोंदीची प्रत अभिलेखावर दाखल केलेले नाही. घटनेच्या दिवशी आरोपी सुनिल उईके यांचे घराविषयी आम्ही सहनिशा केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्रं. १७ मध्ये पंचांना किती वाजता उपस्थीत राहायचे आहे याची वेळ नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९-०१-२०२५ मी व माझयासोबत मोहम्मद सलीम ब.क्रं. ९८०, पोलिस नाईक तुषार खडके ब.क्रं २१६६ असे पो.स्टे. देवलापार अंतर्गत पवनी बिट येथे पेटरोलिंग करत असतांना सांकाळी ५.३० वाजताच्या सुमारास गुप्त माहिती मिळाली की, पवनी येथील सुनील उईके आपल्या घरी मोहाफुल दारू बाळगुन त्याची विक्री करत आहे, हे मी खोटे सांगत आहे.

५}		हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर आम्ही पवनी येथील दोन पंच नामे हरीष चौकशे व मोरेश्वर कोडवते यांना संमस देवुन पंचनामा करीता हजर राहण्यास सांगितले., हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व आरोपीच्या घरी पवनी येथील वार्ड क्रं. ५ येथे जावुन आरोपीच्या घराची पाहणी केली असता त्याच्या घरात दोन प्लास्टीक बॉटल व एक प्लास्टीकची कैनमध्ये एकुण ५ लिटर मोहाफुल दारू मिळुन आली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी सि.ए. तपासणी करीता १८० एम.एल. एका काचेच्या शिशी मध्ये वेगळी काढुन सिलबंद केले व व त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या व तसेच उर्वरीत दारू मोक्यावर पंचांसमक्ष नाश करण्यात आली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्रं. १८ मी पोलिस स्टेशनमध्ये तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीष्ठांच्या सांगण्यावरून आरोविरूध्द खोटी रिपोर्ट दिली व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>.
<u>फेरतपास काही नाही.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत,					माझे समक्ष,
						सही/-
रामटेक.						(डी. सी. वोराणी)
दिनांक : २१/११/२०२५.			न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक